Impact Factor – 6.261 ISSN-2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

*Multidisciplinary International E-research Journal*

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

**March -2019**

**Special Issue – CLXIX (A)**

## EMERGING TRENDS IN HUMANITIES & COMMERCE

**Guest Editor**
Dr.Dipak N. Raut

**Chief Editor**
Dr.Dhanraj T.Dhangar

**The Journal is indexed in:**

University Grant Commission (UGC) Sr. No. 40705

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

Global Impact Factor (GIF)

Universal Impact Factor (UIF)

International Impact Factor Services (IIFS)

Indian Citation Index (ICI)

Dictionary of Research Journal Index (DRJI)

Scanned by CamScanner

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | जवाहरलाल नेहरूंचा आर्थिक दृष्टीकोन | महाजन संजय बाबूराव | 10 |
| 2 | अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील प्रज्ञावंत शैक्षणिक गरजांचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. अमोल मांडेकर | 20 |
| 3 | परराष्ट्रीय धोरण व डॉ. आंबेडकर | प्रा. मंगेश वाहाणे | 26 |
| 4 | स्वयंसेवी संघटनांची जागतीक पार्श्वभुमी | प्रा. कमलेश मानकर | 32 |
| 5 | भारतातील कौटुंबिक समस्या–कौटुंबिक अत्याचार | प्रा. विशाखा मानकर | 37 |
| 6 | भारतातील काळा पैसा अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ. एन.बी मटपती | 45 |
| 7 | स्त्रीवादी दृष्टिकोनातून कळप | डॉ. प्रभाकर देसाई / आरती भोसले | 49 |
| 8 | विजय तेंडुलकरांच्या नाटकातील आशय आणि आकृतीबंध | डॉ. भूमिका गो. बानखडे | 56 |
| 9 | मानवी अधिकार आणि एड्स | प्रा.डॉ. एन.बी. पोहकर | 60 |
| 10 | आदिवासींसमोरच्या विविध समस्या | डॉ.कमल रविंद्र पोटदुखे, | 64 |
| 11 | वृध्दांच्या समस्या | शितल हरिषचंद्र उजाडे | 68 |
| 12 | स्त्री मानवाधिकार आणि स्त्री विकास | प्रा. डॉ. रावसाहेब श. ठोके | 73 |
| 13 | संत तुकारामाचे समाज सुधारणावादी विचार | प्रा.महेंद्र द. झलके | 77 |
| 14 | आज्ञापत्र – एक समीक्षात्मक विश्लेषण | डॉ. पंकज वानखडे | 81 |
| 15 | संपादक महात्मा गांधी यांचे हिंदुत्व | डॉ. शिवाजी जाधव | 88 |
| 16 | दहशतवादाचे बदलते स्वरूप आणि घ्यावयाची सावधगिरी | प्रा. डॉ. सुधारकर जावळे | 93 |
| 17 | राजर्षी शाहु महाराज यांचे आरक्षण चळवळीतील योगदान | प्रा. सुधीर नारायणराव देशमुख | 99 |
| 18 | साधनांच्या वापरामुळे स्त्रियांच्या आरोग्यावर होणारा परिणाम | सीमा. म. उपासनी (सौ. देशपांडे) / प्रा. डॉ. सुजाता व. सवाने | 103 |
| 19 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदिय लोकशाही संबंधी विचार | प्रा.शहाणे रंजना | 111 |
| 20 | अन्नभेसळ व अन्नसुरक्षा कायदा | डॉ. क्षमा चव्हाण | 116 |





Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
March 2019

# परराष्ट्रीय धोरण व डॉ. आंबेडकर

प्रा. मंगेश वाहाणे
सहायक प्राध्यापक डॉ. एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी

आपला भारत देश अतिशय महान आहे. अशा या महान देशाची संस्कृती देखील तेवढीच महान आहे. या पावन भूमीमध्ये अनेक सम्राट, राजे, महाराजे व महात्मे होऊन गेले. इतकेच नव्हे तर असे म्हणतात की, आमच्या देशात तेहत्तीस कोटी देवतांचे अस्तित्व आहे. असे असतांनाही दलित व अस्पृश्यांची स्थिती कोणीही बदलू शकला नाही. शेकडो वर्षापासून हा बहुसंख्य समाज गुलामीमध्ये जीवन व्यतीत करत होता. प्रज्ञासुर्य, बोधीसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथमच अस्पृश्यांमध्ये स्वाभिमानाची भावना जागृत केली. गुलामांना तुम्ही गुलाम आहात याची जाणीव करून दिली. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे अनंत काळापासून मुका असलेला समाज बोलू लागला. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी उपेक्षित समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले.

डॉ. आंबेडकर हे अतिशय विद्वान आणि प्रकांडपंडित होते. त्यांच्या ज्ञानाला मर्यादा नव्हती. अर्थशास्त्र, मानवशास्त्र इत्यादी ज्ञानशाखांमध्ये त्यांनी अत्यंत मौलिक भर घातली. त्याचप्रमाणे कायदेपंडित, शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, श्रेष्ठ दर्जाचे पत्रकार, सांसदपटू, समाजसुधारक, राजकीयतज्ञ म्हणून त्यांची ख्याती सर्वदूर होती. ते जागतिक स्तरावरिल महान विद्वान होते. त्याकाळात त्यांच्या इतका प्रकांडपंडीत भारतात दुसरा कोणी नव्हता.

परराष्ट्रीय धोरण :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमीच देशाचे हित चिंतले आहे. आपल्या पक्षाचा जाहिरनामा असो किंवा राज्यसभेमधील त्यांचे चिंतनशील भाषणे असोत यामध्ये त्यांचे विचार हे देशभक्तीने ठासून भरलेले असे. ते आपले विचार स्पष्ट आणि निर्भिडपणे मांडत असत. ते विचार मांडतांना सरकारच्या धोरणावर जोरदार हल्ला करत असत. डॉ. आंबेडकरांचे देशाच्या परराष्ट्रीय धोरणाबाबतचे विचार हे अत्यंत मुलगामी आणि दूरदृष्टीचे आहेत.

देशात जानेवारी १९५२ मध्ये सार्वत्रिक निवडणूका घेण्याचे जाहिर होताच डॉ. आंबेडकरांनी निवडणूका लढविण्याच्या दृष्टीने आपला पक्ष शेडयुल्ड कॉस्ट फेडरेशनची बैठक बोलावली. ६ ऑक्टोबर १९५१ च्या शेडयुल्ड कॉस्ट फेडरेशन या आपल्या पक्षाच्या बैठकीत त्यांनी पक्षाचा जाहिरनामा तयार केला. याच बैठकीमध्ये तो जाहिरनामा मंजूर करण्यात आला. देशातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि परराष्ट्रीय प्रश्नांसंबंधी भारताचे परराष्ट्रीय धोरणासंबंधीचा अत्यंत आवडीचा विषय होता. त्यांनी आपल्या पक्षाच्या जाहिरनाम्यात भारताच्या परराष्ट्रीय धोरणासंबंधीचा मुद्दा मांडला. भारताला स्वातंत्र मिळाले तेव्हा भारताचे जगातील सर्वच देशांशी अगदी मित्रत्वाचे व स्नेहाचे संबंध होते. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. आज



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013) Special Issue | March 2019
UGC Approved No. 40705

भारताला खरा मित्र राहिलेला नाही. भारताचे हित चिंतील असा मित्रदेश नाही. आज भारत देशाचा विचार करतांना असे दिसून येते की, भारतातील मोठया प्रमाणात पैसा हा संरक्षणासाठी खर्च केला जातो. यासाठी विध्वंसकारी अनुबॉम्ब तयार करण्यात येतात. त्यासाठी मोठया प्रमाणात पैसा खर्च केला जातो.

आज भारत देशाची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे कारण भारताचे हित चिंतील असा मित्र देश नाही. या परिस्थितीला तत्कालीन सरकारचे चुकीचे धोरण हे कारणीभूत ठरत आहे. भारताचे काश्मीर बाबतीचे धोरण, संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये चीनच्या बाबतचे धोरण आणि कोरियन युद्धाबाबतची उदासिनता यामुळे इतर देशांनी भारताकडे जाणून दुर्लक्ष केले आहे. जगातील देश भारतावर नाराज आहेत याचे प्रमुख कारण म्हणजे तत्कालीन सरकारचे चुकीचे परराष्ट्रीय धोरण होय. शेडयुल कॉस्ट फेडरेशनला कॉग्रेस पक्षाचे काश्मीरबाबतचे धोरण मुळीच मान्य नाही. कॉग्रेसने पुढे याच धोरणाचा पुरस्कार केला तर भारत व पाकिस्तान या दोन देशामध्ये तणाव निर्माण होईल आणि यामुळे या दोन देशात युद्ध होईल अशी डॉ. आंबेडकरांनी चिंता व्यक्त केली. जाहिरनाम्यात पुढे म्हटले की, भारत व पाकिस्तान या दोन देशांमध्ये मित्रत्वाचे नाते निर्माण व्हावे असे शेडयुल कॉस्ट फेडरेशनला प्रामाणिकपणे वाटते आहे. पाकिस्तानच्या धोरणाबाबत पुढीलप्रमाणे विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

१) फाळणी झालेल्या हिंदुस्थानच्या एकीकरणाची भाषा करणे आता पूर्णपणे बंद करावे. भारत व पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश आहेत हे आता आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे.

२) काश्मीर मधील बहुसंख्यांक असलेला प्रदेश पाकिस्थानला जोडावा आणि बहुसंख्यांक हिंदू असलेला जम्मू व लडाख हा प्रदेश भारताला जोडावा यामुळे या दोन देशातील तणाव कायमचा संपुष्टात येऊन शांतता प्रस्थापित होण्यास मदत होईल शेडयुल्ड कॉस्ट फेडरेशन पक्ष निवडणूकीमध्ये याबाबत पोषक वातावरण निर्मितीसाठी प्रचार करेल.

चीनला संयुक्त राष्ट्रसंघाचे कायमचे सदस्यत्व देण्यात यावे या भारताच्या मागणीवर डॉ. आंबेडकरांनी जोरदार टिका केली आहे. भारताच्या या मागणीमुळे जगातील इतर दोस्त राष्ट्रे भारतावर नाराज झाली आहेत. चीन आपल्या हक्कांसाठी लढण्यास समर्थ असतांनाही जबरन भारताने जोखीम पत्करली आहे. यामुळे संयुक्त राष्ट्रातील कायम सदस्यत्वासाठी आपण आजही संघर्ष करीत आहोत. युनोमधील आपल्या कायम सदस्यत्वाचा पाठपुरावा न करता भारताने चीनसाठी पाठपूरावा करणे हे डॉ. आंबेडकरांना हास्यास्पद वाटते. या भारताच्या धोरणामुळे अमेरिकेकडून तांत्रीक आणि आर्थिक मदत मिळणे आता खूप अवघड होऊन बसले आहे. भारताने स्वतःचा उत्कर्ष करण्याचा जोमाने प्रयत्न करावा. प्रथमतः आपले हात मजबूत झाले तरच जगामध्ये भारताची पतप्रतिष्ठा व वजन वाढण्यास मदत होईल. अशा प्रकारच्या धोरणाचा

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
March 2019

शेडयुल्ड कॉस्ट फेडरेशन पुरस्कार करेल असे जाहिरनाम्यात डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे नमूद केले होते.

पंडीत नेहरूंचे हे आत्मघातकी परराष्ट्रीय धोरण डॉ. आंबेडकरांना मुळीच आवडले नव्हते. भारताला भविष्यातील संभाव्य धोक्यांपासून सावधतेचे इशारे देणारे त्यांचे मत होते. देशातील प्रमुख वर्तमानपत्रांनी शेडयुल्ड कॉस्ट फेडरेशनच्या या जाहिरनाम्याला चांगल्याप्रकारे प्रसिद्धी दिली होती. डॉ. आंबेडकरांनी आपल्या पक्षाच्या जाहिरनाम्याच्या माध्यमातून कॉग्रेसच्या परराष्ट्रीय धोरणातील उणीवा दाखवून दिल्या. एवढेच नव्हे तर त्यावर परिणामकारक उपायही सुचविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विचारवंत होते. भारताच्या चुकीच्या परराष्ट्रीय धोरणामुळे देशाचे नुकसान होत आहे. म्हणून ते सरकारच्या परराष्ट्रीय धोरणाची तीव्र समीक्षा करीत असत.

वरिष्ठ सभागृहात म्हणजेच राज्य सभेमध्ये २६ ऑगस्ट १९५४ रोजी भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर चर्चा घडून आली. पंतप्रधान व परराष्ट्रीय खात्याचे मंत्री पंडीत नेहरू यांनी एक ठराव मांडून आपल्या परराष्ट्रीय धोरणाचे समर्थन केले. त्यांनतर डॉ. आंबेडकरांनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर अत्यंत चिंतनशील भाषण करून सभागृहातील सदस्यांचे मन जिंकले होते. चीन व रशीया ही राष्ट्रे साम्राज्यवादी विचाराची आहेत हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. चीन या देशाने ल्हासा व तिबेट जबरदस्तीने गिळंकृत करून आपल्य ताब्यात घेतली. त्यामुळे चिनची सीमा भारताच्या सीमेपर्यंत येऊन पोहोचली. साम्राज्यवादी विचाराचा चीन कधीही भारतावर आक्रमण करू शकतो. त्यामुळे भारताने नेहमी सतर्क राहिले पाहिजे. असा सावधतेचा इशारा डॉ. आंबेडकरांनी भारत सरकारला दिला. परंतू नेहरू सरकारने डॉ. आंबेडकरांच्या इशा-याकडे गांर्भियाने पाहिले नाही.

चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय हे जेव्हा 'हिंदी चीनी भाई-भाई' अशी घोषणा देत भारतात आले तेव्हा देशात सर्वत्र ही घोषणा दुमदुमत होती. दूरदर्शी डॉ. आंबेडकरांनी सरकारला स्पष्ट शब्दात सांगीतले की, हे हिंदी चीनी भाई-भाई पणाचे ढोंग संपूर्ण जगाला लवकरच दिसेल. ज्यावेळी हे ढोंग नजरेसमोर येईल त्यावेळी चीनने भारतावर आक्रमण केलेले असेल. दूर्दैवाने तसेच घडून आले. दूरदृष्टी असलेल्या डॉ. आंबेडकरांनी चीनचे हे ढोंग तेव्हाच ओळखले होते. परंतू भारतीय राज्यकर्त्यांनी त्याकडे दूलर्क्ष केले होते. एक थोर व प्रखर देशभक्त असलेल्या डॉ. आंबेडकरांना या संभाव्य धोक्यापासून भारत देशाला वाचवायचे होते.

राज्यसभेतील परराष्ट्रीय धोरणावर भाषण करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले, सरकारचे परराष्ट्रीय धोरण हे प्रामुख्याने तीन तत्वावर आधारित आहे, एक शांतता, दोन साम्यवाद आणि म्हणजे स्वतंत्र लोकशाहीतील सह अस्तित्व तिसरे तत्व म्हणजे सीटो कराराला विरोध. यातीन तत्वांचे मुल्यांकन करण्यासाठी प्रथम पार्श्वभूमी समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. पार्श्वभूमीमध्ये

ISSN : 2348-7143
March 2019

दूसरे तिसरे काही नसून साम्यवादाचा विस्तार हेच आहे. मे १९४५ मध्ये दूसरे महायुद्ध समाप्त झाले. परंतू तोपर्यंत रशियाने दहा युरोपियन राज्यांवर ताबा मिळवला होता. त्यामध्ये फिनलंड, इस्टोनिया, लॅटवीया, लुथियानिया, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया व अल्बानिया या देशांचा समावेश आहे. याशिवाय रशियाने जर्मनीचा ऑस्ट्रिया, नॉर्वे व डेनिश बॉर्नहोम या बेटांच्या भागावर सत्ता प्रस्तापित केली होती. जगामध्ये जलदगतीने साम्यवादाचा विस्तार होत आहे.

आपण प्रथम शांतता या तत्वाचा विचार करून आपल्याला युद्ध नको आहे, शांतता हवी आहे. परंतू प्रश्न असा आहे की, आपण फार मोठी किंमत देऊन शांतता विकत घेत आहोत. देशाचे विभाजन करून शांतता खरेदी करता येत नसते आणि असे देशाचे विभाजन करून ते साम्यवादी देशांच्या घशात घ्यायचे का ? साम्यवादी देश हे एखादया भयंकर राक्षसासारखे आहेत. रशियाचा उल्लेख करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, रशिया हा देश स्वातंत्राचे आमिष दाखवून इतरांना आपल्या घशात घालत आहे. रशियाने मुक्त केलेल्या देशात स्वातंत्र नसून गुलामगिरी पत्करणे असेच आहे. आपण अशाप्रकारची शांतता मिळवत आहोत की, राक्षसाला वारंवार खाऊ घालून ताकदवान बनवत आहोत आणि एक दिवस असा येईल की तो राक्षस आपल्याकडे वळेल आणि तूच आता शिल्लक आहेस असे म्हणून तो आपल्यालाही खाण्यास मागेपूढे पाहणार नाही.

दूसरे तत्व सह-अस्तित्व स्पष्ट करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, साम्यवाद आणि स्वतंत्र लोकशाही एकत्र नांदू शकेल काय ? यांच्यात संघर्ष होणार नाही अशी अपेक्षा आपण करून शकतो काय ? साम्यवाद आणि लोकशाही ही विचारसरणी डॉ. आंबेडकरांना पूर्णतः विसंगत वाटते. ते पुढे म्हणंतात, साम्यवाद हा जंगलातील एखादया वणव्यासारखा आहे. त्यांच्या मार्गात येईल त्याला तो फस्त करून टाकतो. त्या वणव्याच्या वाटेवर असणा-या देशांना फार मोठा धोका निर्माण झाला आहे असा इशारा डॉ. आंबेडकरांनी दिला. ते पुढे म्हणतात, भौगोलिक घटक हा परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत अत्यंत महत्वाचा मानला जातो. कोणत्याही देशाचे परराष्ट्रीय धोरण हे त्याच्या भौगोलिक स्थानावरून ठरविले जाते. जे इंग्लंडसाठी चांगले आह ते भारतासाठी चांगले असत नाही.

सीटो या कराराचे समर्थन करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात, सीटो ही संघटना अमेरिका, ब्रिटन,फ्रान्स, तूर्कस्थान, इराण व पाकिस्तान या देशांची मिळून बनली आहे. ही संघटना इतर देशांवर होणा-या आक्रमणांना पायबंद घालविण्यासाठी अस्तित्वात आली आहे. आपले पंतप्रधान या संघटनेत सहभागी होण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाउले उचलणार आहेत की नाही ? असा प्रश्न विचारून डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात, रशिया काय म्हणेल याचा विचार करून पंतप्रधान सीटोला विरोध करतात असेच मला वाटते भारताला एका बाजूने पाकिस्थान व दुस-या बाजूने मुसलमान या देशांनी गराडा घातला आहे. चीनला ल्हासापर्यंत ताबा घेण्याची परवानगी देऊन आपल्या

Scanned by CamScanner

पंतप्रधानांनी चीनची सीमा भारताच्या सिमेला मिळविण्यासाठी सहकार्य केले आहे. यावावत डॉ. आंबेडकरांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. ते पुढे म्हणतात की, ज्यांना दुस-यावर आक्रमण करण्याची सवय जडली आहे त्यांच्याकडून हिंदूस्थानावर आक्रमण होण्याची भिती निर्माण झाली आहे असा सावधतेचा इशारा त्यांनी सरकारला दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात की, आपल्या परराष्ट्रीय धोरणाचे मुख्य तत्व इतर देशांचे प्रश्न सोडविणे आणि आपल्या देशाचे प्रश्न चिघळत ठेवणे असेच दिसते. आपल्या देशातील काश्मीरचा प्रश्न अजून तसाच आहे. काश्मीर प्रश्न सोडविण्यात आपण अजून यशस्वी झालो नाहीत. काश्मीर प्रश्न ही एक समस्या आहे हेच सर्वजण विसरून गेले आहेत. आपल्या पंतप्रधानांनी काश्मीर ते भारत असा सुरंग खोदण्याचे ठरविले आहे. ही अत्यंत भयंकर वाव असल्याचे मला वाटते. या सुरंगाचा आपण एवढाच वापर करू असे त्यांना वाटते. परंतु दुस-या मार्गानेही हल्लेखोर भारतात घूसू शकतात. हल्लेखोर दूस-या मार्गाने घूसून काश्मीर वळकावून तो थेट पठाणकोटपर्यंत जाऊ शकतो.

पंतप्रधानांनी अंगीकारलेल्या पंचशीलावर समिक्षा करतांना डॉ. आंवेडकर म्हणाले, पंतप्रधानांनी माओने मान्यता दिलेल्या पंचशीलावर विसंवून राहू नये. पंचशील हे वौद्धधर्माचे महत्वाचे अंग आहे. त्या पंचशिलावर माओचा किंचितही विश्वास असता तर आपल्या देशातील बौद्ध धर्मियांना त्यांनी वेगळ्या पद्धतीने वर्तणूक दिली असती. पहिली वाव ही की, राजकारणात पंचशिलाला स्थान दिले जात नाही आणि दूसरी वाव म्हणजे कम्युनिष्ट राष्ट्रातील राजकारणात पंचशिलाला स्थान दिले जात नाही. साम्यवादी राष्ट्रांची कृती दोन तत्वावर घडते. पहिले म्हणजे त्यांची नीती ही सतत वदलत असते. दूसरे तत्व हे की, नीतीही उदयाची असत नाही. आशिया हा आता एक युद्धभूमी वनला आहे. अर्ध्याच्यावर आशिया साम्यवादी वनला आहे. आपली जर स्वातंत्र्यावर निष्ठा असेल तर आपण ज्या राष्ट्रांना लोकशाहीवादी स्वातंत्र राष्ट्रे मानतो त्या देशांची आपण एकजूट केलेली कधीही फायदयाचे होईल.

आपल्या भाषणाच्या शेवटी गोव्याचा उल्लेख करतांना डॉ. आंवेडकर म्हणतात की, गोवा मुक्त करण्यावावतची आताची पंतप्रधाची भूमिका योग्य आहे. त्यांच्या भूमिकेला सर्वांनीच पाठिंवा दिला पाहिजे. त्याचवरोवर ही वस्तूस्थिती आहे की, भारत स्वतंत्र झाला तेव्हा गोव्याच्या मुक्तीसाठी एक शिष्टमंडळ पंतप्रधानांना भेटले होते परंतू त्यांनी त्यावर कोणतीच कारवाई केली नाही. गोवा मुक्त करण्यासाठी लहानशी पोलिस कार्यवाही देखील पुरेशी ठरली असती. परंतू आपले पंतप्रधान पोर्तूगिजांवावत मवाळचे धोरण घेत आहेत. गोव्यावावद त्वरीत निर्णय घेऊन तो हिंदूस्थानामध्ये सामील करून घ्यावा अन्यथा पोर्तुगिज इतके प्रवळ होतील की त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे ही कठिण होऊन जाईल.

Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
March 2019

डॉ. आंबेडकरांच्या राज्यसभेतील परराष्ट्र धोरणावरील अभ्यापूर्ण भाषणात जागतिक स्तरावर फार मोठी प्रसिद्धी मिळाली होती. लंडन येथील न्यूज, क्रॉनिकल, द डेली टेलीग्राफ आणि द ऑब्झर्वर या वर्तमानपत्रांमध्ये डॉ. आंबेडकरांनी भारत सरकारच्या परराष्ट्रीय धोरणावर केलेल्या समिक्षेला ठळकपणे प्रसिद्ध केले होते. डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणात भारताने जागतिक शांततेचे प्रयत्न न करता प्रथमतः आपल्या देशातील समस्यांचे निराकरण करावे आणि त्यानंतर जागतिक शांततेचा प्रयत्न करावा. त्याचबरोबर चीन आणि रशिया या साम्यवादी राष्ट्रांवर विश्वास ठेवणे आत्मघातकीपणाचे होईल असा सावधतेचा इशारा त्यांनी दिला होता. तसेच चीन किंवा रशिया या साम्यवादी देशांच्या आक्रमणांपासून बचाव करण्यासाठी भारताने 'सीटो' या संघटनेमध्ये सहभागी व्हावे अशी सूचनाही डॉ. आंबेडकरांनी केली होती.

प्रखर देशभक्त असलेल्या डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणात देश हिताला प्रथम प्राधान्य द्यावे असे ठासून सांगीतले. त्यांच्या परराष्ट्रीय धोरणासंबंधीच्या विचारांमध्ये प्रखर देशभक्ती दिसून येते. त्याचप्रमाणे सरकारच्या धोरणावर नेमके बोट ठेवून त्यातील उणिवा जगासमोर आणल्या. त्यांचे भाषण म्हणजे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या माहितींनी भरलेले उत्कृष्ठ विचार चिंतन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असो वा व्याख्यान ते देशाच्या आणिबाणीच्यावेळी अत्यंत प्रभावी ठरत असे. याचे कारण म्हणजे त्यांच्या गाढ व्यासंग, राष्ट्रीय प्रश्नांकडे पाहण्याची त्यांची सचोटी व निःस्वार्थ भावना.

संदर्भ :-

१) डॉ. नरेंद्र जाधव - डॉ. आंबेडकर - समग्र वैचारिक चरित्र
२) डॉ. काशिनाथ गायकवाड - डॉ. भिमराव रामजी आंबेडकर
३) प्रविण गायकवाड - डॉ. आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख
४) शंकरराव नगराळे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वरत्न कसे

Scanned by CamScanner